ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २४ | पुणें, बुधवार तारीख १५ जानेवारी, १९५८ | अंक ३

## विविध माहिती

**तापसरीच्या सांथीचे बळी** —गेल्या वर्षी भारतांत तापसरीची साथ आली होती. ह्या साथीचा जोर जुलै महिन्याच्या मध्याच्या सुमारास बराच होता. तापाच्या सांथीनें सुमारें ४० लाख लोकांना अंथरुणावर लोळविलें होते. त्यापैकीं १,००० रोगी मात्र दगावले. ह्याच प्रकारच्या तापाची दुसरी लाट आल्यास तिला तोंड देण्यासाठी भारत सरकारच्या आरोग्य खात्यानें तयारी ठेवली आहे.

**इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूट** —इंडिअन स्टॅटिस्टिकल इन्स्टिटयूट ही संस्था राष्ट्रीय महत्त्वाची म्हणून जाहीर करण्यांत येणार असून तिला पदव्या देण्याचा अधिकारहि देण्यांत येणार आहे. ही संस्था प्रा. पी. सी. महालनवीस ह्यांनी स्थापन केलेली आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाचा कच्चा आराखडा त्यांनीं तयार केलेला आहे.

**एक्सपोर्ट-इंपोर्ट बँकेचे प्रतिनिधी** —भारताची सध्याची आर्थिक स्थिति कशी आहे तिचा अभ्यास करण्यासाठी आणि दुसऱ्या पंचवार्षिक योजनेला मदत देणें कितपत शक्य आहे तें अजमावण्यासाठी अमेरिकन सरकारच्या एक्सपोर्ट इंपोर्ट बँकेचें प्रतिनिधि मंडळ लवकरच भारतांत येण्यास निघणार असल्याची बातमी आहे.

**नाताळनिमित्त अभिनंदन कार्डें** —१९५७ सालीं अमेरिकन लोकांनीं नाताळानिमित्त २ अब्ज, ४० कोटी अभिनंदनाचीं कार्डें पाठवून नवा उच्चांक स्थापन केला. त्यापूर्वीच्या वर्षी २० कोटी कार्डें कमी पाठविण्यांत आलीं होतीं. हीं कार्डें पाठविण्यासाठीं लोकांनीं ५ कोटी, २० लाख डॉलर्स खर्च केले. १९४७ पेक्षां दुप्पट कार्डें १९५७ सालीं पाठविण्यांत आलीं.

**गया येथील विकास** —बुद्ध गया ह्या ठिकाणाच्या महाबोधी देवळाचा विकास करण्यासाठी बुद्ध गया टेंपल ॲडव्हायसरी कमिटीनें एक योजना आंखली आहे. योजनेप्रमाणें ध्यानासाठी एक बाग, हिंवाळयांत यात्रेकरूंना उतरण्यासाठी एक मैदान आणि एक वाचनालय, अशी व्यवस्था करण्यांत येणार आहे. शिवाय, सयामचें सरकार देवळापासून जवळ एक धर्मशाळा बांधणार आहे.

**टागोरांच्या ग्रंथांची आवृत्ति** —१९६१ सालीं कविवर्य रवींद्रनाथ टागोर ह्यांची १०० वी जयंती साजरी करण्यांत येणार आहे. त्यानिमित्तानें साहित्य ॲकेडेमी त्यांच्या ग्रंथांचीं एक आवृत्ति प्रसिद्ध करणार आहे. टागोरांचे ग्रंथ आठ खंडांत विभागण्यांत येतील. भारतामधील प्रमुख भाषांत त्यांचीं भाषांतरेंहि करण्यांत येतील.

**जपानमधील छोटे उद्योगधंदे** —जपानमधील छोट्या उद्योगधंद्यांचें कार्य कसें चालतें, तें पाहण्यासाठी पंजाब सरकार आपलें प्रतिनिधि मंडळ जपानला पाठविणार आहे. राज्याचे अर्थमंत्री मंडळाचे पुढारी असतील. चंदीगड येथें छोटे उद्योगधंदे स्थापित करण्याबाबत सरकारनें केलेल्या आवाहनास चांगली साद मिळाली आहे.

**भिलई कारखान्यासाठी यंत्रसामुग्री** —भिलई येथें उभारण्यांत येणाऱ्या पोलादाच्या कारखान्यासाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्रीचा तिसरा हप्ता मुंबई बंदरांत आला आहे. ह्या हप्त्यांत ४,५०० टन वजनाचें साहित्य आहे. ह्यापूर्वी यंत्रसामुग्रीचे दोन हप्ते विशाखापट्टम् मार्गानें भिलई येथें रवाना करण्यांत आले आहेत. सर्व यंत्रें उरल्स पर्वतामधील रशिअन कारखान्यांत तयार झालेलीं आहेत.

**भोपाळ येथील रेडिओ केंद्र** — नव्यानें बनविण्यांत आलेल्या मध्यप्रदेशाच्या गरजा भागविण्यासाठी भोपाळच्या रेडिओ केंद्राची शक्ति वाढविण्यांत येणार आहे. सध्यांच्या ध्वनिक्षेपक यंत्राऐवजीं १० किलोवॅट शक्तीचें लघुलहरींवर ध्वनिक्षेत्रण करणारें यंत्र येत्या ८–१० महिन्यांत बसविण्यांत येईल, अशी माहिती नभोवाणी खात्याचे मंत्री श्री. केसकर ह्यांनीं सांगितली.

**जपानी पुरातवस्तु शास्त्रज्ञांची भेट** —१९५८ च्या नोव्हेंबर महिन्यांत भगवान् गौतमबुद्धाच्या निर्याणाला २,५०० वर्षे पुरीं होतात. त्यानिमित्तानें जपानमधील पुराणवस्तु शास्त्रज्ञांची एक तुकडी भारतांत येणार आहे. बुद्धाशीं संबंध आलेल्या ऐतिहासिक स्थळांचा दौरा करण्यांत तुकडी तीन महिने घालविणार आहे. तुकडीचा खर्च जपानमधील एक वृत्तपत्र देणार आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## निमदुष्काळी विभागांत विहिरीद्वारें पाणीपुरवठा
### खास तगाईकर्जें

मुंबई सरकारनें निमदुष्काळी जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना विहिरी बांधण्यासाठी तगाई–कर्जें देण्याकरितां जिल्ह्यांतील कलेक्टरांच्या जवळ २७ लक्षांहून अधिक रुपयांची रक्कम दिली आहे.

जिल्हानिहाय देण्यांत आलेल्या रकमा पुढीलप्रमाणें आहेत.

बनासकांठा (रु. १,५०,०००); भडोच (रु. १,००,०००); ठाणें (रु. ३,५००० ); पंचमहाल (रु. ३,००,००० ); बीड (रु. १,००,००० ); अहमदनगर (रु. १,५०,००० ); सोलापूर (रु.१,००,०००); पुणें (रु.५०,०००); नाशिक (रु.२०,०००); बडोदें (रु.३८,०००); साबरकांठा (रु. ५,००,०००); मेहसाणा (रु. ४,००,००० ); आमरेली (रु. ५०,००० ); अहमदाबाद (रु. ५,०१,००० ); खेडा (रु. १,००,००० ); परभणी (रु. ३६,००० ); पश्चिम खानदेश (रु. १७,००० ); कुलाबा (रु. ४,००० ); नांदेड (रु. ३६,००० ); सुरत (रु. १३,०००) व पूर्व खानदेश (रु. १७,००० ).

उन्हाळ्यांत येणाऱ्या पिकांचें संरक्षण करण्याच्या दृष्टीनें या योजनेनुसार नवीन विहिरी बांधण्यासाठी व जुन्या विहिरींची डागडुजी करण्यासाठी कर्जें देण्यांत येतील.

गरजू शेतकऱ्यांना त्वरित ग्रँट देण्याच्या दृष्टीनें उपाययोजना करण्याविषयीं कलेक्टरांना सांगण्यांत आलें आहे. तसेंच, त्यांना तगाई–कर्जासाठी आलेल्या अर्जांचा निकाल तातडतोब लावण्याविषयींहि सूचना देण्यांत आली आहे.

## गणराज्य दिनानिमित्त कामगारांना पगारी सुट्टी
### गिरणी–मालकांना सरकारची विनंती

भारतीय गणराज्याचा आठवा वाढदिवस हा रविवार दि. २६ जानेवारी रोजीं येतो. गणराज्यदिनानिमित्त होणाऱ्या उत्सवांत सर्व औद्योगिक कामगारांचें कोणत्याहि प्रकारें पगारांत नुकसान न होता त्यांना भाग घेतां यावा, अशी मुंबई सरकारची इच्छा आहे. कित्येक कारखान्यांनीं २६ जानेवारीची सुटी यापूर्वीच दिली असेल. ज्या गिरणीमालकांनीं ही सुटी जाहीर केली नसेल ते सर्व गिरणीमालक, मग ते मालकसंघाचे सभासद असोत वा नसोत, हा दिवस बदलीची सुटी म्हणून नव्हे तर वेगळी पगारी सुटी म्हणून जाहीर करतील, अशी अपेक्षा आहे.

## तलावांतील पाण्याचे सांठे

मुंबई राज्यांतील इरिगेशन खात्याकडे असणाऱ्या तलावांतील पाण्याचे सांठे तारीख १ जानेवारी, १९५८ रोजीं पुढीलप्रमाणें होते—


| तलावाचें नांव | पूर्ण भरल्या वेळीं सांठा | गतवर्षी याच दिवशीं सांठा | आजचा सांठा |
|---|---|---|---|
| भाटघर तलाव | २४१९८ | २०३६८ | १५८३१ |
| खडकवासला तलाव | ३०९१ | २७१२ | २२८२ |
| भंडारदरा तलाव | ११११८८ | ९९४० | ७००६ |
| विसापूर तलाव | १५१० | ११३३ | ४७८ |
| दारणा तलाव | ७७६३ | ७२६८ | ५५३५ |
| चंकापूर तलाव | १५४८ | १५४८ | ११६६ |

आकडे दशलक्ष घनफुटाचे आहेत.


बचतीतून राष्ट्रसेवा
बचत करा—
समृद्ध व्हा.
तुमच्या समृद्धीवर राष्ट्राची समृद्धी अवलंबून आहे.
सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.


शाखा: फोर्ट, दादर, माहिम, धारवी, पुणें, बेळगांव.

दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड
हेड ऑफिस : पुणें शहर
शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर (तांबट) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा
श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) | श्री. का. म. महाजन (उपाध्यक्ष)
अधिकृत भांडवल रु. १५,४३,८१०
विक्री झालेलें भांडवल रु. ७,९३,८१०
वसूल भांडवल रु. ४,००,०००
रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह रु. १,१४,०००
एकूण खेळतें भांडवल रु. ६५,००,०००चे वर
बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.
सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
श्री. रा. वा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर्स


किर्लोस्कर
इलेक्ट्रिक पंपिंग सेट
यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाल टिकावू.
आपल्या पिकांची जोपासना करण्यासाठी एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकपणें काम करीत आहेत.
सविस्तर माहितीसाठीं लिहा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी द. सातारा

# अर्थ

बुधवार, ता. १५ जानेवारी, १९५८



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

## परदेशी प्रवासाच्या उत्पन्न-खर्चाचा आढावा

### हौशी प्रवासी आकर्षण्याची आवश्यकता

भारताला प्रवाशांच्या येण्यामुळें जें उत्पन्न मिळतें, त्यापेक्षा भारतीय प्रवाशांचा परदेशांतील खर्च जास्त असे. त्या कारणानें, परदेशीय येण्या-देण्यांतील ह्या हिशेबांत नेहमीं तूट आढळायची. १९५६ सालीं मात्र, १९५० नंतर पहिल्या प्रथमच, वाढावा दिसून आला. त्यापूर्वींच्या वर्षांचे तुलनात्मक आकडे उपलब्धच नाहींत.

**परदेशी प्रवाशांमुळें मिळालेलें उत्पन्न व परदेशांतील प्रवासावर केलेला खर्च**

**( आंकडे कोटी रुपयांचे )**

| वर्ष | जमा | खर्च | फरक |
|---|---|---|---|
| १९५० | ४·२ | १४·६ | –१०·४ |
| १९५१ | ७·७ | २५·० | –१७·३ |
| १९५२ | ९·८ | ९·९ | – ०·१ |
| १९५३ | ७·१ | १३·६ | – ६·५ |
| १९५४ | ८·४ | १२·० | – ३·६ |
| १९५५ | १०·३ | १२·३ | – २·० |
| १९५६ | १५·५ | १३·४ | + २·१ |

१९५५ चे मानानें १९५६ सालीं ठोक उत्पन्न १०·३ कोटी रु. चें १५·५ कोटी रु. झालें; म्हणजे त्यांत सुमारें ५ कोटी रुपयांची वाढ झाली. भारतांत आलेल्या प्रवाशांची संख्या ४५,००० वरून ६८,००० वर गेली; त्याचप्रमाणें महागाई वाढल्यामुळें प्रवाशांचा भारतांतील खर्चहि वाढला. पाकिस्तानांतून आलेल्या प्रवाशांची गणना वरील आकड्यांत केलेली नाहीं. स्टर्लिंग विभागाकडून १० कोटी रुपयांची मिळकत झाली. म्हणजे, एकूण मिळकतींत त्यांचें प्रमाण अनुक्रमें ६४·५% व २५·२% पडलें. ह्या दोन्हीं विभागांकडून मिळालेलें उत्पन्न प्रत्येकीं सुमारें २ कोटी रुपयांनीं सुधारलें. ह्या उत्पन्नाची विभागवार छाननी खालीं केली आहे. जमेचे आंकडे अंदाजी असून, आपल्या प्रवाशांनीं परदेशांत केलेल्या खर्चांचे आंकडे प्रत्यक्ष नोंद झालेले आहेत.

प्रवासाच्या उद्देशानुसार छाननी केली, तर १९५६ मध्यें डॉलर विभागांतून जी रक्कम आली, तिच्यापैकी ७४% रक्कम हौशी प्रवाशांकडून मिळाली; १५% रक्कम व्यावसायिकांनीं व्यवसायाप्रीत्यर्थ येथें खर्च केली. ह्या उलट, स्टर्लिंग गटांतून मिळालेल्या रकमेपैकी ४६% रक्कम व्यावसायिक प्रवाशांनीं दिली; हौशी प्रवाशांनीं फक्त ३२% रक्कम दिली.

**उत्पन्नाची विभागवार छाननी**

**( आंकडे कोटी रुपयांचे )**

| | १९५५ | | | १९५६ | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | जमा | खर्च | फरक | जमा | खर्च | फरक |
| स्टर्लिंग विभाग | ७·८ | ६·१ | +१·७ | ९·९ | ६·८ | +३·१ |
| डॉलर विभाग | १·९ | १·३ | +०·६ | ३·९ | १·१ | +२·८ |
| इतर विभाग | ०·६ | ४·९ | –४·३ | १·६ | ५·४ | –३·८ |
| एकूण | १०·३ | १२·३ | –२·० | १५·५ | १३·४ | +२·१ |

सर्व देशांच्या प्रवाशांनीं मिळून भारतांत हौसेखातर ६·३८ कोटी रुपये खर्च केले, तर हौशी भारतीयांनीं परदेशांत ९·७० कोटी रु. ची चैन उपभोगली. व्यवसायाकरितां येणाऱ्या परदेशीयांनीं भारतांत ५·६४ कोटी रुपये खर्चले; आम्हीं परदेशांत त्यासाठी फक्त ३९ लक्ष रुपये खर्च केले. शिक्षणासाठी भारतांत परदेशीयांनीं ३३ लक्ष रुपये खर्च केले; आम्हीं १·५३ कोटी रुपये किंमतीच्या शिक्षणाची आयात केली. आरोग्यासाठी तत्सम आंकडे अनुक्रमें १७ लक्ष रु. व १३ लक्ष रुपये असे आहेत.

डॉलर विभागांत हौसेखातर प्रवासाला जाण्यास भारत सरकारनें आधीं बंदी घातली, ती गेल्या वर्षीच्या प्रारंभीं इतर विभागांतील प्रवासासहि लागू केली. जे परदेशी प्रवास आवश्यक नाहींत, अशांवरील नियंत्रणें गेल्या वर्षीच्या मध्याचे सुमारास वाढविण्यांत आलीं. त्याचा परिणाम होऊन, आपला परदेशांतील खर्च कमी झाला आहे. भारतांत परदेशी पाहुण्यांना आकर्षित करण्याचा आपल्या सरकारनें प्रयत्न चालविला आहे. तो ज्या प्रमाणांत यशस्वी होईल, त्या प्रमाणांत त्यांचा येथील खर्च वाढेल, म्हणजे आपलें उत्पन्न सुधारेल आणि परदेशी हुंडणावळीचे हिशेबांत अधिकाधिक वाढावा दिसूं लागेल. १९५७ च्या पहिल्या सहामाहींत १९५६ च्या पहिल्या सहामाहीच्या मानानें खर्च निम्यावर ( ३·३ कोटी रु. ) आला आहे, असे उपलब्ध आंकडे दर्शवितात. उत्पन्न वाढविण्याचा मार्ग हाच जास्त हितकारक व दीर्घ परिणामकारक आहे, हें उघड आहे.

---

## शास्त्रीय प्रगतीच्या महत्त्वाची जाणीव

इंडिअन सायन्स कॉंग्रेसच्या ४५ व्या अधिवेशनाचें उद्घाटन करतांना पंतप्रधान श्री. नेहरू ह्यांनीं भारतामधील शास्त्रज्ञांना सरकारतर्फे जास्तींत जास्त मदत आणि उत्तेजन देण्यांत येईल असें आश्वासन दिलें आहे. ह्या प्रसंगीं बोलतांना त्यांनीं रशिआनें आकाशांत सोडलेल्या उपग्रहांचा उल्लेख करून रशिअन शास्त्रज्ञांना सरकारकडून मिळत असलेल्या भरपूर मदतीचें दृश्य-फल म्हणजेच रशिआची शास्त्रांत झालेली अपूर्व प्रगति होय, अशा आशयाचे विचार व्यक्त केले. सायन्स कॉंग्रेसच्या अधिवेशनाला रशिअन शास्त्रज्ञांचें आठ जणांचें मंडळ आलेलें होतें.

मंडळाचे पुढारी डॉ. बार्डिन ह्यांना असें विचारण्यांत आलें कीं, रशिआनें अमेरिकेला सार्वत्रिक शास्त्रीय प्रगतींत मागें टाकलें आहे कां? त्यावर उत्तर देतांना डॉ. बार्डिन म्हणाले कीं, तसें नाहीं; अजून अमेरिकेबरोबर यावयास रशिआला पुष्कळ अवधि लागेल.

अंतराळांत उपग्रह सोडण्याच्या कामीं रशिआनें आघाडी मारलेली असतांना सुद्धां एक प्रमुख रशिअन शास्त्रज्ञ आपल्या देशाचा तौलनिक मागासलेपणा कबूल करतो, ह्याची संगति कशी लावावयाची? ह्या प्रश्नाचें उत्तर समजून घेण्यासाठी रशिआच्या अर्थव्यवस्थेचीं पायाभूत तत्त्वें ढोबळ मानानें लक्षांत घेतलीं पाहिजेत. प्रथम हें लक्षांत घेतलें पाहिजे कीं, रशिअन राज्यकर्त्यांनीं साध्य-साधन विचार अतिशय स्पष्टपणानें केलेला आहे. भांडवलदारी देशांनीं कित्येक शतकांत केलेली आर्थिक व तांत्रिक प्रगति कांहीं दशकांच्या आंतच करावयाची हें रशिआचें साध्य आहे. हें साध्य गांठण्यासाठी अर्थशास्त्रासुद्धां इतर शास्त्रांचा उपयोग करण्याचें त्यांनीं ठरविलेलें आहे. साध्य-साधन विचार अशा रीतीनें एकदां पक्का केल्यावर आर्थिक अगर तांत्रिक प्रगतीच्या कोणत्या अंगावर अधिक जोर द्यावयाचा, तें आपोआप उघड होतें. वास्तविक आधुनिक जीवनपद्धति जगण्यासाठी ज्या मूलभूत वस्तूंचें उत्पादन करावें लागतें त्यांच्या उत्पादनांत रशिआ अजूनहि अमेरिकेच्या मागेंच आहे. उदाहरणार्थ, कोळसा, पोलाद, वीज, अन्नपदार्थ, इत्यादि. पण, उत्पन्न होणाऱ्या साधनसंपत्तीपैकी किती भाग कोणत्या कामीं व केव्हां लावावयाचा ह्या बाबतींत जरूर तर कठोर निर्णय घेण्याची पात्रता रशिअन राज्यपद्धतींत अधिक आहे. ह्या पद्धतीला हुकूमशाही म्हणून चिठ्ठी चिकटविण्यास हरकत नाहीं. इष्ट फल पदरांत पाडून घेण्याच्या कामीं ही पद्धत अधिक यशस्वी आहे किंवा नाहीं, हा खरा प्रश्न आहे. भांडवलदारी जगांतील राष्ट्रांची प्रगति त्या राष्ट्रांत प्रचलित असलेल्या वैयक्तिक स्वातंत्र्यामुळें होते असा दावा नेहमींच करण्यांत येतो. व्यक्तीवादी समाजव्यवस्थेचें पुढारीपण गेल्या कांहीं वर्षांत अमेरिकेकडे गेलें आहे. अमेरिका म्हणजे प्रगति, असें समीकरणच झालें होतें. पण आतां जर्मनीसारख्या पुढारलेल्या देशांतहि अमेरिकेचें वजन कमी होऊं लागलें आहे.

शास्त्रीय प्रगतीसाठी किती आर्थिक मोल द्यावयाचें, हा प्रश्न भारतासमोर लवकरच अगदीं स्पष्ट स्वरूपांत उभा राहण्याचीं चिन्हें दिसत आहेत. ह्या बाबतींत दूरगामी निर्णय घ्यावयाचे असतील तर अर्थशास्त्राच्या स्थानाची मूलभूत तपासणी झाली पाहिजे.

---

**कलकत्त्यामधील गलिच्छ वस्त्या**—कलकत्ता इंप्रुव्हमेंट ट्रस्टनें शहरांतील गलिच्छ वस्त्या उठवून त्या जागीं राहण्याचे गाळे बांधण्याची योजना आंखली आहे. योजनेसाठी ४० लाख रुपये खर्च येणार आहे. त्यांपैकी २४ लाख रुपये कर्ज म्हणून व १२ लाख रुपये मदत म्हणून मध्यवर्ती सरकारतर्फे मिळणार आहेत.

**सीलोनला रशिआची मदत**—सीलोनमध्यें नुकत्याच झालेल्या वादळाच्या व पुराच्या तडाख्यांत सांपडलेल्या लोकांना मदत म्हणून रशिआनें २,५०० टन तांदूळ आणि २,००० रुबल्स किंमतींचीं औषधें देऊं केलीं आहेत. मदतीचा हा पहिला हप्ता असून आणखीहि मदत मिळण्याचा संभव आहे.

## नांगल येथील खताचा नवा कारखाना

भाक्रा–नांगल धरणावर उत्पन्न होणाऱ्या विजेच्या निर्मितीचा फायदा घेऊन त्या ठिकाणीं खताचा व जड पाण्याचा कारखाना काढण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. ह्या कारखान्यासाठी जी विजेची यंत्रसामुग्री लागणार आहे ती पुरविण्याचें कंत्राट ब्रिटनमधील इंग्लिश इलेक्ट्रिक कंपनीला देण्यांत आलें आहे. खताचा कारखाना चालविण्यासाठी एका खास वीजनिर्मिति केंद्रांची उभारणी करणें आवश्यक आहे. ह्या उपकेंद्रासाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्रीची किंमत सुमारें २ कोटी रुपये होईल. कारखान्यासाठी १,६०,००० किलोवॅट वीज वापरावी लागेल. भारताला परदेशीय हुंडणावळीची सध्यां टंचाई भासत आहे. ती लक्षांत घेऊन यंत्रसामुग्रीची किंमत मागाहून घेण्यासंबंधीं कंपनीबरोबर करार करण्यांत आला आहे. तथापि, सर्वच किंमत मागाहून द्यावयाची आहे, असें मात्र नव्हे. एकूण किंमतीच्या १० टक्के किंमत प्रथमच द्यावयाची असून दुसरा १० टक्के किंमतीचा हप्ता यंत्रसामुग्री भारतांत आल्यावर द्यावयाचा आहे. हे दोन्ही हप्ते रुपयाच्या चलनांतच द्यावयाचे आहेत. ह्या व्यवस्थेमुळें भारताच्या परदेशी हुंडणावळीवरील सांठ्यावर तावडतोब ताण पडणार नाहीं. उरलेली ८० टक्के किंमत मात्र पौंडी चलनांत द्यावयाची आहे. कारखाना चालू झाल्यावर दोन अगर तीन वर्षांनीं ही किंमत द्यावयाची आहे. १९६० च्या एप्रिलच्या सुमारास कारखाना सुरू होईल अशी अपेक्षा आहे. ह्या कारखान्यासाठी परदेशाहून मागविलेल्या यंत्रसामुग्रीचा हा तिसरा हप्ता आहे. ह्यापूर्वी एका इटालिअन कारखान्याकडून ३·५ कोटी रुपयांचें साहित्य मागविण्यांत आलें आहे. त्याशिवाय एका फ्रेंच कंपनीकडून ७·५ कोटी रुपयांची यंत्रसामुग्री मागविण्यांत आली आहे.

---

## अमेरिकेकडून अधिक मदत मिळण्याची शक्यता

दिल्ली येथील अमेरिकन वकिलातीचे सल्लागार मि. विनथ्रॉप ब्राऊन ह्यांनीं मद्रास येथें सदर्न इंडिआ चेंबर ऑफ कॉमर्सपुढें भाषण करून भारताला दुसरा पंचवार्षिक कार्यक्रम पार पाडण्यासाठी अमेरिकेकडून अधिक मदत मिळण्याची शक्यता ध्वनित केली आहे. त्यांच्या भाषणाला अमेरिकेचें कॉन्सल जनरल मि. थॉमस सिमॉन्स हेहि हजर होते. मि. ब्राऊन आपल्या भाषणांत म्हणाले कीं, भारताला आणखी बरीच आर्थिक मदत देण्यांत येईल अशी अपेक्षा आहे. सध्यां त्यासंबंधीं वॉशिंग्टन येथें वाटाघाटी चालू आहेत. लवकरच कांहींतरी निर्णयहि घेण्यांत येईल. कांहीं राजकीय स्वरूपाच्या प्रश्नावर भारत व अमेरिका ह्यांच्यामध्यें मतभेद असले, तरी त्याचा परिणाम आर्थिक मदतीवर होणार नाहीं. अमेरिकेनें आपल्या संरक्षणाची जी लष्करी तयारी केलेली आहे, तीमुळें, आणि सुमारें ४० देशांशीं जे करार करण्यांत आलेले आहेत त्यांच्यामुळें जगांत स्थैर्य व शांतता राखण्यास मदतच झालेली आहे. ह्या स्थैर्यामुळेंच भारत व इतर देश ह्यांना आपला आर्थिक विकास साधण्याचें कार्य सातत्यानें करतां आलें आहे. १९४५ च्या जुलै महिन्यापासून गेल्या वर्षअखेरपर्यंत अमेरिकेनें जगांतील इतर देशांना २७,५५० कोटी रुपयांची मदत केलेली आहे. ह्या मदतीपैकी फार मोठा भाग आर्थिक विकासासाठी अगर युद्धानें उध्वस्त झालेल्या देशांची पुनर्घटना करण्यासाठी खर्च झालेला आहे. सुमारें २२,३२५ कोटी रुपयांची रक्कम सरळ मदत म्हणून देण्यांत आली असून बाकीची कर्जाऊ देण्यांत आलेली आहे. मदतीसाठी दिलेल्या रकमेपैकी फक्त एक तृतिआंश रक्कम लष्करी मदतीसाठी देण्यांत आलेली आहे.

## कर्ज देतांना पाळावयाचे दहा नियम

### कर्जविषयक व्यवहाराचें तत्त्वज्ञान

महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा ह्यांत मिळून व्यापारी बँकांनीं ११ कोटी रुपये कर्जाऊ दिलेले आहेत. ह्या बाहेरच्या शहरीं मुख्य कचेरी असलेल्या परंतु ह्या विभागांत शाखा असलेल्या व्यापारी बँकांनीं येथें दिलेल्या कर्जांची रक्कमहि तेवढीच भरेल. सेंट्रल बँका, अर्बन बँका, लँड मॉर्गेज बँका, इत्यादींनीं दिलेल्या कर्जांची बेरीज आणखी १४ कोटी रुपये होईल. म्हणजे, बँकांच्या मराठी विभागांतील एकूण कर्जांची रक्कम किमान ३५ कोटी रुपये तरी असेल. कर्जांच्या प्रकरणांची छाननी करून त्यांना मंजुरी देण्यांत हजारों डायरेक्टर, मॅनेजर, शाखाधिकारी, ह्यांचा हात असणार, जुन्या कर्जांची फेड होत असते, नवीं कर्जें देणें चालू असतें, कांहीं कर्जें थकतात व बुडतात तर कांहींवर कोर्टामार्फत इलाज करावे लागतात. कर्ज देण्याचे बाबतींत जबाबदार व्यक्तींनीं कांहीं अलिखित नियम पाळले, तर लायक अर्जदारांची सोय होईल, बुडित कुळांना कर्जें मिळणार नाहींत, कर्ज देणाऱ्या संस्था मजबूत होतील आणि आर्थिक संसारास बळकट आधार प्राप्त होईल. ह्या दृष्टीनें, कर्जमंजुरीचे कामीं दक्षता कशी घेण्यांत यावी, ह्याविषयीं दहा नियम येथें दिले आहेत. ते कर्ज देणाराप्रमाणें घेणारालाहि उपयुक्त वाटतील. *

(१) कर्जांची मागणी, ही कटकट नसून संधि व आव्हान आहे, असें समजा.

जेव्हां एखादा कर्जदार कर्ज मागण्यासाठी येतो, तेव्हां ह्याप्रमाणें त्याच्याकडे पाहा: मला माहीत असलेल्या गोष्टींचा उपयोग करण्याची, अनुभव कारणीं लावण्याची ही उत्कृष्ट संधि आहे; माझ्या विवेकाला व तारतम्याला हें आव्हान आहे. एकिकट प्रश्न बँकेच्या, अर्जदाराच्या व समाजाच्या हिताच्या दृष्टीनें सोडविण्याचा हा प्रसंग आहे. मनुष्य, व्यवहार, उद्योगधंदा, आर्थिक परिस्थिति, इत्यादिविषयीं माझ्या ज्ञानांत भर घालण्याला मदत होणार आहे.

(२) अगोदरच मत बनवून टाकूं नका; दक्षतेनें, समजून घेण्याच्या बुद्धीनें, सहानुभूतिपूर्वक, सर्व कांहीं ऐकून घ्या.

हा नियम दिसायला साधा दिसतो, पण पाळायला सोपा नाहीं. आपल्या पूर्वग्रहाप्रमाणें आपण दुसऱ्याच्या शब्दांतून व वागण्यांतून अर्थ काढतों; त्याच्या मनांत खरें काय आहे हें त्यामुळें आपल्याला कळूंच शकत नाहीं. म्हणून, त्याचें म्हणणें दक्षतेनें ऐकून, समजून, घेतल्यावरच आपलें मत बनवावें. बहुतेक वेळां, आपण अर्जदाराचें म्हणणें पूर्णपणें ऐकण्याच्या अगोदरच, तो समजावून सांगत असतांनाच, त्याला काय उत्तर द्यावयाचें व कसें द्यावयाचें, ह्याचा मनांत विचार करीत राहतों!

(३) आपल्याला ज्याचें ज्ञान नाहीं, त्याचेबद्दल बतावणी करूं नका.

आपल्या स्वतःच्या मर्यादांची कबुली देणें हें शहाणपणाचें लक्षण आहे. आपल्याला जी गोष्ट माहीत नाहीं, ती माहीत करून घेण्यासाठी प्रश्न विचारायला, शंकांचें निरसन करून घ्यायाला कांहींहि हरकत नाहीं. अर्जदार जेव्हां बँकरला कांहीं गोष्टी माहीत आहेत असें गृहीत धरून चालतो आणि त्या खरोखर माहीत नसल्या तर अर्जदाराला त्याविषयीं जरूर खुलासा विचारावा. आपलें अज्ञान झांकण्याच्या आकर्षणाला बळी पडतां कामा नये. त्यामुळें अर्जदाराला बँकरविषयीं विश्वास वाटेल आणि निर्णय घेण्यासहि मदत होईल.

(४) पत अजमावतांना आंकडे व तपशील ह्यांची तपासणी आवश्यक असली, तरी सबंध व्यवहाराचें एकत्र चित्र डोळ्यांसमोर ठेवूनच निष्कर्ष काढला पाहिजे.

आंकडे आणि तपशील ह्यांत फार गढून गेलों, तर अर्जदाराची पत निश्चित ठरविण्याच्या कामीं अडचण निर्माण होते; सबंध व्यवहाराचें सबंध चित्र डोळ्यांपुढें उभें राहूं शकत नाहीं. प्रत्येक फांदी स्वतंत्रपणें तपासली, तरी झाड दुरून पाहिल्याखेरीज त्याची पुरी कल्पना येत नाहीं. म्हणून झाडाकडे नीट पहा, सबंध झाड तपासा, आजूबाजूच्या झाडींतील त्या झाडाचें स्थान निश्चित करा.

(५) कर्ज सुरक्षित असून पुरत नाहीं; तें ठरल्याप्रमाणें परत फेडलें गेलें पाहिजे.

जें कर्ज बुडणार नाहीं, तें सुरक्षित कर्ज होय. जें कर्ज सुरक्षित असून परतफेडीच्या अटीप्रमाणें फेडलें जाऊं शकेल, परतफेडीसाठी कर्जदारावर ताण पडणार नाहीं, तें कर्ज निर्दोष होय. कर्जाला पुरेसें तारण असून भागणार नाहीं; परतफेड करण्याची कर्जदाराची पात्रता हवी. बँकेनें कर्जें परतफेडीसाठी दिलेलीं असतात; कर्जदारानें तीं कायम वापरण्यासाठी त्याला दिलेलीं नसतात. तारण कितीहि मोठें असलें, तरी "कर्जदार कर्जाची परतफेड कशी करणार आहे?" हा प्रश्न स्वतःला नेहमीं विचारीत जा.

(६) सर्व माहिती मिळण्यापूर्वी, सर्वांगीण विचार करण्यापूर्वी, शब्द देऊं नका.

"न बोललेल्या शब्दांचे तुम्हीं मालक आहां" अशी आठवण देणारें वाक्य प्रत्येक बँकरच्या टेबलासमोर लिहिलेलें पाहिजे. करायला तयार होईपर्यंत आणि त्याच्या परिणामांचें बंधन स्वीकारीपर्यंत 'होय' असें म्हणूं नका. सर्व माहिती मिळाल्याची खात्री झाल्यावर, सर्व बाजूंनीं विचार केल्यावर, नंतरच मग शब्दांत गुंतलें तरी चालेल. एकदां निर्णय जाहीर केला म्हणजे त्या निर्णयाला पोषक असे मुद्दे आपण शोधूं लागतों आणि आपली बुद्धि चालेनाशी होते.

(७) अप्रिय निर्णयाची जबाबदारी लोन कमिटीवर, बोर्डावर किंवा हेड-ऑफिसवर लोटूं नका.

"तुमचें म्हणणें मला पटतें; पण लोन-कमिटी, बोर्ड किंवा हेड-ऑफिसला पटलें नाहीं, तर मी काय करणार?" असें म्हणणें हा संस्थाद्रोह होय. कर्जाला नकार, जास्त तारणाची मागणी, इत्यादि अप्रिय गोष्टींबद्दल जबाबदारी टाळणें व दुसऱ्यावर लादणें अनिष्ट आहे. तुम्हींच बँकेचे प्रतिनिधि आहांत; तुम्हींच बँक आहांत. बँकेनें केलेल्या निर्णयांत तुमचा हात नसला, तो निर्णय तुम्हांला मान्य नसला, तरी त्याची जबाबदारी तुम्हीं पत्करली पाहिजे. "आम्हांला असें वाटतें; आम्हीं असें ठरविलें" अशीच भाषा वापरली पाहिजे. बँकेंत तुम्हीं चर्चा करा, उलटसुलट मुद्दे मांडा. पण एकदां निर्णय झाला कीं, तो सर्वांचा म्हणून समजला पाहिजे. त्याची तरफदारी स्वतःचा विरोध असतांहि केली पाहिजे.

(८) पूर्ण विचारांतीं, कर्जाला नकार द्यायची किंवा जास्त

* 'उद्यम' च्या ऑगस्ट, १९५५ च्या अंकांत प्रस्तुत लेखकाचा "कर्ज मिळवा, पण त्याकरितां कोणकोणत्या गोष्टी आवश्यक आहेत?" हा लेख प्रसिद्ध झाला होता, त्याकडे लक्ष वेधणें जरूरीचें आहे.

तारण मागण्याची जरूरी वाटली तर निर्भयपणें, मुख्य प्रश्नाला बगल न देतां, आपला निर्णय अर्जदाराला कळवा.

निर्णय योग्य आहे, ह्या खात्रीनें अर्जदाराला उद्देशून स्पष्ट शब्दांत बोला. तुमचा निर्णय बरोबर होता, हें अर्जदारच कधीं कधीं मागाहून कबूल करील! कर्ज न मिळण्याची अर्जदारालाच खात्री होती, जास्त तारण बँक मागील हें अर्जदार ओळखूनच होता, व्याजाचा दर त्यानें मुद्दामच कमी मागितला होता, हें नंतर लक्षांत आलें म्हणजे बँकरनें नकार आत्मविश्वासानें देण्याची आवश्यकता सहज पटेल.

(९) सर्व माहिती मिळाली असून सर्वांगीण विचार झाला आहे आणि निर्णय घेण्याला योग्य कारण आहे, अशा परिस्थितींत जबाबदारी पत्करून निर्णय घ्या.

तुम्ही तुमच्या अधिकारांत वागत आहां, तुम्ही माहिती पूर्णपणें मिळविलेली आहे, स्वतःच्या निर्णयाबद्दल तुम्हांला खात्री आहे, अशा परिस्थितींत इतरांचा सल्ला विचारण्याची, जबाबदारी विभागूं पहाण्याची, काय आवश्यकता आहे? जेव्हां खात्री वाटत नसेल, तेव्हांच फक्त सल्ला विचारा. पण आपण आपल्याला अधिकार आहे ह्याचें प्रदर्शन करण्यासाठीं किंवा इतरांच्या साह्याची गरज नाहीं. ह्याची प्रौढी दाखविण्यासाठीं निर्णय घेऊन वागणें चुकीचें ठरेल; हे निर्णय चुकीचेच होण्याचा फार संभव.

(१०) 'होय' म्हणावयाचें ठरल्यावर आढेवेढे न घेतां होकार द्या.

कोणतेच प्रश्न पूर्णपणें पांढरे किंवा काळे नसतात. कर्जाला मंजुरी द्यावयाची तुम्हीं ठरवलें, ह्याचा अर्थ काळ्यापेक्षा पांढऱ्याचा भाग जास्त आहे. तेव्हां निर्णय कळवतांना भलेपणा दाखवा, कर्जदारावर उपकार करीत असल्याची भावना नको. पैसे द्यावयाचे, मग त्याला कलंक कां लावता? कर्ज द्यावें का देऊं नये, ह्याबद्दल साशंकता संपून कर्ज द्यावयाचें ठरलें कीं ठरलें; तें देतांना आढेवेढे नकोत.

वरील दहा नियमांसारख्या नियमांवर फाजील अवलंबून राहूं नका. नियम किंवा सूचना ह्यामुळें निर्णयांची पार्श्वभूमि तयार झाली, तरी ते कांहीं निर्णय घेणार नाहींत. पत अजमावण्याला तीव्र बुद्धि लागते. ह्या बुद्धीचा वापर करून प्रत्येक प्रश्न हाताळावा लागतो. नियम कोणीहि सांगूं शकेल.

(श्री. वा. काळे, ह्यांचा उद्यम (जानेवारी, १९५८) मधील लेख)

## छोट्या उद्योगधंद्यांसाठी औद्योगिक सहकारी संस्था व शिक्षण-केंद्रें

भारत सरकारनें मंजूर केलेल्या एका योजनेनुसार मध्यप्रदेश, मुंबई व राजस्थान राज्यांत छोट्या उत्पादकांसाठी औद्योगिक सहकारी संस्था, उत्पादन व शिक्षणकेंद्रें व निरनिराळ्या छोट्या उद्योगधंद्यांसाठी समान व्यवस्था केंद्रें स्थापण्यांत येतील. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी मध्यवर्ति व्यापार व उद्योगखात्यानें या राज्य सरकारांस सुमारें २७ लाख रु. मंजूर केले आहेत.

या योजनेनुसार मुंबई राज्यांत पुणें येथें टॉर्च बल्बच्या उत्पादनासाठी एक, दर्यापूर व हिंगोळी येथें कातडी मालासाठी एकेक व अमरावती येथें स्टेशनरी वस्तूंसाठी एक अशीं चार शिक्षण-उत्पादन केंद्रें स्थापण्यांत येतील. छत्र्या तयार करण्यासाठीं व सुतार कामासाठींहि अशीं आणखी दोन केंद्रें उघडण्यांत येतील. या राज्यास सुतारकाम, लोहारकाम व कातडी काम या धंद्यांबाबत उत्पादन व शिक्षणकेंद्रें चालू ठेवण्यासाठींहि आर्थिक मदत देण्यांत आली आहे. राजकोट येथें एक मध्यवर्ती कारखाना स्थापण्याकरतांहि या राज्यास आणखी मदत देण्यांत आली आहे.

कण आणि क्षण
(सुखी जीवनाच्या पाऊलवाटा)
लेखक:—श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. २ रु. ८ आ.

સુખી જીવનની પગદંડી
(ગૃહજીવનનું માંગલ્ય)
લેખક:—શ્રી. વા. કાળે, સંપાદક, "અર્થ"
ગુજરાતી બીજી આવૃત્તિ ] [ કિંમત રૂ. ૧-૮-૦

* दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड *
(शिड्यूल्ड बँक)
हेड ऑफिस:—१० बुधवार पेठ, पुणें २
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, (फोन २७६३)
मुंबई शाखा:—८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १
कॉमनवेल्थ बिल्डिंग, (फोन २५३४०८)

अध्यक्ष श्री. ग. रा. साठे | उपाध्यक्ष श्री. दा. ग. आपटे

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल ... ... रु. ७,३०,४९०
खेळतें भांडवल ... ... रु. ५८,००,०००

★ चालू खातें व्याज १ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज १½% टक्के ★ मुदत ठेवीवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
—श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए., (ऑ.), बी. कॉम्., एलएल्. बी. मॅनेजर

## मुंबई सहकारी कायद्यावरील लाड समितीचा अहवाल

### ( लेखांक १ )

लेखक :—श्री. स. वा. कुलकर्णी., बी. ए. एलएल. बी. पुणें ४.

दि. १९–२-५६ रोजीं मुंबई सरकारनें माननीय जी. एम्. लाड यांचे अध्यक्षतेखाली मुंबई सहकारी सोसायटीच्या १९२५ च्या कायद्यांत व त्याखालील कानूंत योग्य त्या दुरुस्त्या सुचविणेसाठी व कच्छ, सौराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा ह्या भागांतील प्रचलित कायद्याचें परिशीलन करून त्या सर्व भूभागास एक सहकारी कायदा सुचवणेसाठी समिति नेमली होती. माननीय लाड समितीनें मुंबई राज्य सरकाराकडे अहवाल पाठवलेला असून त्यावर योग्य तो विचारविनिमय होईल. कालांतरानें ह्या कायद्याबाबतचें विधेयक मुंबई राज्य विधान सभेत चर्चेसाठी मांडलें जाईल असें वाटतें. मुंबई राज्यांतील सर्वव्यापी सहकारी चळवळीबाबत ह्या अहवालांत कोणत्या महत्त्वाच्या व मुलभूत दुरुस्त्या सुचवलेल्या आहेत, हें समजून घेणें आवश्यक आहे. सदरचा अहवाल विस्तृत असून सर्वच दुरुस्त्यांचा येथें तपशीलवार विचार करतां येणार नाहीं. परंतु ठोकळ मानानें महत्त्वाच्या आणि ठळक अशा कोणत्या तरतुदी समितीनें सुचविल्या आहेत त्याचाच प्रामुख्यानें क्रमशः उल्लेख करणेचें योजिलें आहे.

१९२५ च्या मुंबई सहकारी संस्थांच्या प्रचलित कायद्यांत बऱ्याच उणीवा आहेत. सहकारी संस्थांच्या कारभाराविषयक सोयीच्या दृष्टीनें जरूर ते बदल करावयाचे झाल्यास त्याबाबतच्या योग्य तरतुदी सदरचे कायद्यांत घालावयास पाहिजेत. सहकारी चळवळ व सहकारी संस्थांचा कारभार गतिमान् व उत्कर्षाप्रत नेणारा असा असल्याशिवाय सहकारी योजनांचें पाऊल खऱ्या अर्थानें प्रगतिपथावर आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं. स्वतंत्र भारताचा विकास व प्रगत सहकारी चळवळ हीं एकमेकांस पूरक असून दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील कांहीं महत्त्वाची उद्दिष्टें सहकारी कार्यक्षमतेवर अवलंबून आहेत. सहकारी कार्यक्षेत्र व्यापक व प्रगतिपर अवस्थेपर्यंत न्यावयाचें झाल्यास त्याबाबतच्या कायद्यांत आमूलाग्र बदल करणें व योग्य त्या तरतुदी करणें जरूरीचें आहे. सहकारी संस्था, तिचे पदाधिकारी, सहकारी कार्यकर्ते, समाजसेवक, कायद्याचा अभ्यास करणारी मंडळी, ह्या सर्वांनीं ह्या अहवालाचा विचार करून त्यावर चर्चा करणें सहकारी चळवळीच्या दृष्टीनें कल्याणकारक ठरणार आहे.

### पोटनियम दुरुस्ती

मुंबई सहकारी संस्थांच्या १९२५ च्या कायद्यांत, एखाद्या सहकारी संस्थेच्या पोटनियमांत योग्य तो बदल करून दुरुस्त-पोटनियम अंमलांत आणावयास लावणेची सत्ता रजिष्ट्रार यांना नव्हती. फारतर अशा स्वरूपाची दुरुस्ती सुचवणेचा अधिकार होता.परंतु योग्य ती दुरुस्ती पोटनियमांत घालून अमलांत आणणेची सत्ता दिलेली नव्हती. एखाद्या सहकारी संस्थेचा उत्कर्ष अगर प्रगति होणेसाठी तिचे पोटनियमांत त्याप्रमाणें बदल करून घेणेचा अधिकार दिल्याशिवाय संस्था उत्कर्षाप्रत पोंचणार नाहीं. माननीय लाड समितीच्या शिफारसींत कलम ४ ह्या उद्देशानें सुचविलेलें आहे. मराठवाड्याच्या भू भागास हैद्राबाद सहकारी सोसायट्यांचा कायदा लागू आहे. सदरच्या कायद्यांत अशा स्वरूपाची सत्ता रजिस्ट्रार को. सो. यांना दिलेली आहे. मध्यप्रांत आणि वऱ्हाड सहकारी सोसायट्यांच्या १९४९ च्या दुरुस्त कायद्यांतहि अशी स्वरूपाची तरतूद आहे. ही तरतूद मुंबई १९२५ च्या कायद्यांत घालणेची सहकारी कार्यकर्त्यांनीं बरेच दिवस मनीषा दर्शविली होती. सहकारी संस्थेंतील पदाधिकारी कांहीं वेळेस अनंत हेतू मनांत ठेवून सहकारी संस्थेच्या प्रगतीस पोषक अशा सुधारणा पोटनियमांत घालून इष्ट तो बदल करून घेत नाहींत. अर्थात् त्याचा विपरीत परिणाम सहकारी संस्थेवर होऊन संस्था अधोगतीस पोंचते. सर्व सहकारी संस्था गतिमान् व्हाव्यांत व त्यांचा उत्कर्ष व्हावा ह्यासाठी कालमानाप्रमाणें जरूर त्या सर्व सुधारणा होणेचें दृष्टीनें इष्ट तो बदल पोटनियमांत करून तो अंमलांत आणणेसाठी जरूर ती सत्ता रजिस्ट्रार यांना देणेचें समितीनें सुचविलें आहे. ह्याबाबत असा आक्षेप येणेचा संभव आहे कीं, ही पद्धत लोकशाहीच्या तत्त्वास अनुसरून अवलंबिली आहे काय? ह्यावर उत्तर असेंच आहे कीं, ही पद्धत अवलंबिली गेल्यास सहकारी संस्थांचें कल्याण होतें; म्हणूनच ती लोकशाहीच्या तत्त्वास धरून आहे.

### रजिस्ट्रेशन रद्द करणेबाबत

एखाद्या सहकारी संस्थेची जिंदगी व कर्जे दुसऱ्या सोसायटीकडे वर्ग केल्यास अगर एका संस्थेचें दुसरीबरोबर सामीलीकरण केल्यास अगर एका सहकारी संस्थेच्या दोन संस्था केल्यास, अगर संस्थेचा कारभार गुंडाळावयाचा झाल्यास अगर संस्थेनें कामास सुरवात केली नसल्यास सदरच्या सोसायटीचें रजिस्ट्रेशन रद्द करण्याचा हुकूम देणेचा अधिकार ठेवलेला आहे.


नवीन वर्षांत सुप्रतिष्ठित व अग्रेसर बँकेत
अजूनहि खातें उघडलें नसल्यास आतांच

दि
**बँक ऑफ महाराष्ट्र लि.**

स्थापना १९३५ : शेड्यूल्ड बँक
मध्यें खातेदार होऊन आर्थिक व व्यापारी
व्यवहार सोयीचे करा.

बँकिंगच्या विविध व वैशिष्ट्यपूर्ण सेवेंत महाराष्ट्र बँक कृतार्थता मानते.

—भांडवल—

वसूल भांडवल ( भागापोटी आगाऊ भरलेल्या रकमा धरून ) रु. १३,५०,०००चे वर
गंगाजळी व इतर निधि रु. ११,५०,०००
खेळतें भांडवल रु. नऊ कोटींचे वर

स्पेशल सेव्हिंग्ज द. द. अडीच रुपये व्याज.

सेव्हिंग्ज व मुदत ठेवी यांवर व्याजाचे वाढविलेले दर.

बँकेने अलीकडेच मोमिनाबाद, हिंगोली, लातूर व शींव ( मुंबई ) येथें शाखा चालू केल्या आहेत. त्यांचा संबंधी जनतेनें फायदा घ्यावा.

मुख्य कचेरी, पुणें २. चिं. वि. जोग, मॅनेजर.

# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना : १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

टेलिफोन नं. २५५४७४–७५ | चेअरमन— श्री. रमणलाल जी. सरैय्या | पोस्ट बॉक्स नं. ४७२ तारेचा पत्ता–फार्मर बँक

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | |
|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. ४४,११,५०० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. ३१,००,००० |
| | रु. ७१,११,५०० |
| गंगाजळी व फंड | रु. ५९,२८,१०० |
| ठेवी | रु. १०,७१,३३,००० |
| खेळतें भांडवल | रु. १७,६३,७३,००० |

## ११ जिल्ह्यांमध्यें ५६ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तीबद्दल चौकशी करावी.

जी. एम्. लाड
मॅनेजिंग डायरेक्टर.

# दि बेळगांव बँक लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक )

गेलीं १७ वर्षें सतत प्रगतिपथावर असलेली व ठेवीदारांच्या वाढत्या विश्वासास पात्र असलेली बँक.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | ... | रु. ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | ... | रु. १,८७,००० |
| ठेवी | ... | रु. १ कोटी १० लाखांचे वर |
| खेळतें भांडवल | ... | रु. १ कोटी ४० लाखांचे वर |

खालील वाढलेल्या दरानें ठेवी स्वीकारण्यांत येतात.

| | | |
|---|---|---|
| १ व २ वर्षें मुदत | द. द. शें. | ३ टक्के |
| ३ ,, ,, | ,, | ३। ,, |
| ४ ,, ,, | ,, | ३॥ ,, |
| ५ ,, ,, | ,, | ४ ,, |
| सेव्हिंग्ज बँक | ,, | २ ,, |
| होम सेव्हिंग्ज बँक | ,, | २½ ,, |

याशिवाय दरमहा नियमित बचत करण्यासाठीं क्युम्युलेटिव्ह डिपॉझिटची आकर्षक योजना गेलीं ९ वर्षें सुरू असून ती चांगलीच लोकप्रिय झालेली आहे. या योजनेंत ३८ महिन्यांनंतर व्याजासह रक्कम परत मिळते.

दरसाल दर शेंकडा ४ टक्के दराचीं पंचवार्षिक कॅश-सर्टिफिकेट्सहि दिलीं जातात.

बँकेच्या मुख्य कचेरीच्या इमारतींत अद्ययावत् सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय आहे.

विशेष माहितीसाठी समक्ष चौकशी करावी.

रविवार पेठ, बेळगांव.

एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर

स्थापना १९३६

# युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ].

हेड ऑफिस—*पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी, लोणंद, कोल्हापूर व हलकर्णी

ता. ३०-६-५७ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | ३,०३,००० |
| ठेवी व इतर फंडस् | रु. | १,२५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,४०,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष ते दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|
| रु. ३–०–० | रु. ३–४–० | रु. ३–८–० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४–०–० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | २–०–० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ,, | २–८–० |
| चालू डिपॉझिट | ,, | ०–८–० |

सेव्हिंग्ज बँक व से. डिपॉझिट खात्यावर नवीन आकर्षक नियम तयार केले असून व्याजाचे दरांतहि वाढ केली आहे. त्याबद्दलची सविस्तर माहिती आमचे कोणत्याहि शाखेंत समक्ष मिळूं शकेल.

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

# दि सांगली बँक लि.

## सांगली.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ४,५०,००० |
| रिझर्व्हस् व इतर फंडस् | रु. | ७,००,००० |
| खेळतें भांडवल अदमासें | रु. | २,००,००,००० |

: शाखा :

रबकवी, तेरदळ, कवठें महांकाळ, शिरहट्टी, विलिंग्डन कॉलेज, मंगळवेढा, शहापूर, उगार खुर्द, इचलकरंजी, कराड, कोल्हापूर, मुंबई-फोर्ट व मार्केट यार्ड ( सांगली )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.